Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 1.9508(UIF)
Volume-2, Issue-7, Jan-2013 Available online at www.aygrt.isrj.org

# मराठी पत्रकारितेचे बदलते स्वरुप

**प्रा.केशव धोंडिबा टिपरसे**
बाबा नाईक महाविद्यालय, कोकरुड , ता.शिराळा, जि.सांगली.

**प्रस्तावना-**

आजच्या आधुनिक व गतिमान युगामध्ये पत्रकारिता ही मानवी जीवनाचा एक अविभाज्य भाग बनली आहे. लोकशाहीचा तो महत्वाचा चौथा आधार स्तंभ आहे. जगातील सर्वच घडामोडीत मग त्यामध्ये समाजकारण, राजकारण, अर्थकारण किंवा समाजव्यवस्था या सर्वाचे प्रतिबिंब दूरदर्शन, संगणक, इंटरनेट,व इतर सर्वच माध्यमातून संपूर्ण समाजजीवनाचे, हालचालीचे लिखित स्वरुपातील रुप आकलन कक्षेच्या माध्यमातून पडताना आढळते. भारतासारख्या लोकशाही प्रधान देशात पत्रकारितेचे महत्व अनन्यसाधारण आहे. उद्योग, व्यापार, शिक्षण, याबरोबरच समाज आणि संस्कृतीच्या दृष्टीने पत्रकारितेचा विचार करता या सर्व घटकाची दखल आजची पत्रकारिता घेताना दिसते. त्याबरोबरच माहिती विश्लेषण विवेचन, मनोरंजन याद्वारे ज्ञान व लोकशिक्षणाचा पाया वृत्तपत्राच्या माध्यमातून घातला गेला आहे. राष्ट्राच्या विकासात चांगले नागरिक घडवण्यासाठी पत्रकारितेने महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे. अन्यायाला वाचा फोडण्याबरोबरच लोकशिक्षणाचा हेतू साध्य करुन समाजप्रबोधन करता येते. वर्तमानपत्राचे हे कार्य मराठी पत्रकारितेच्या उज्ज्वल इतिहासाची नांदीच आहे. आज ही वर्तमानपत्रे जनसवादाचे प्रमुख साधनाबरोबरच ती लोकाभिमुख ही बनली आहेत.

**पत्रकारितेची संकल्पना :-**

देशातील लोकांच्या, समाजाच्या, भावभावनाचे प्रतिबिंब या लेखनावर पडत असल्यामुळे अनेक अभ्यासकांनी आपापली मते आपल्या मतप्रणालीनुसार मांडलेली आहेत. पत्रकारितेबदल माझे मत असे आहे की, "समाजातील सभोवतालच्या घटनाच्या घटितातून जी सत्य माहिती प्रातिनिधिक स्वरुपात लेखनिच्या माध्यमातून लोकापर्यंत पोहचविली जाते हीच खरी पत्रकारिता होय."

कोणतीही गोष्ट सहजच निर्माण होत नसते तिची काही विशिष्ट प्रयोजने असतात. पत्रकारितेची ही अशीच काही प्रयोजन आपणास सांगता येतील. सत्तेवर अकुंश ठेवणे, समाज प्रबोधन, लोकशिक्षण नैतिक मूल्याची जपणूक करणे, लोकशाही मुल्य रुजवणे, समाजात अभिरुची निर्माण करणे, मनोरंजन करणे अशी बरीचशी प्रयोजने पत्रकारितेची आहेत. बऱ्याच क्षेत्रात पत्रकारितेने आपली दिशा निश्चित केली आहे. प्रत्येक वृत्ताची संपूर्ण माहिती दिली जाते. वेगळा विचार समाजात रुजवला जातो आहे. तो विचार, अग्रलेख, स्तंभलेख, स्फुट लेखातून वाचकांपर्यंत पोहचविला जातो.

**मराठी पत्रकारितेची वाटचाल :-**

मराठी पत्रकारितेच्या सुरूवातीबाबत विचार करताना आपणास बाळशास्त्री जांभेकरांच्या १८३२ मध्ये सुरु झालेल्या 'दर्पण' पासून प्रारंभ करावा लागतो. वयाच्या अवघ्या विस,बाबीसाव्या वर्षी जांभेकरांनी मराठी आणि इंग्रजी या दोन्ही भाषामधून हे वृत्तपत्र सुरु केले. सुरुवातीला दर्पणचे स्वरुप पाक्षिक होते नंतर साप्ताहिकात सुरु झाले. त्याचकाळात 'प्रभाकर' या ही वृत्तपत्राचा उल्लेख केला जातो. दर्पणने ज्या पध्दतीने सामाजिक कार्या बरोबरच पृथ्वी, ग्रहणे, तारे, यंत्र या लोकांना उपयुक्त ठरणाऱ्या गोष्टीची माहिती प्रकाशित होत असे तर प्रभाकर या वृत्तपत्राने राजकिय व सामाजिक विचार जागृतीचे कार्य सुरु केले भाऊ महाजन किंवा

लोकहितवादी (गो.ह.देशमुख) यांनी लिहिलेल्या शतपत्रामूळे महाराष्ट्रातील जनतेला आधुनिक विचाराची ओळख झाली. महाराष्ट्रात सर्वात अधिक काळ चालणारे वृत्तपत्र म्हणजे 'ज्ञानप्रकाश' होय परंतु याही वृत्तपत्रावर मोठया प्रमाणात टीका झाली. तरी परंतु 'ज्ञानप्रकाशने' आपल्या काळात अनेक बदल पाहिले याच काळात वृत्तपत्र म्हणजे देशसेवेचे साधन होय, असे लोकमान्य टिळक, गो.ग.आगरकर, चिपळूणकर व इतर सर्व सहकार्यानी मानले. त्या काळात टिळकानी 'केसरी',आगरकरांनी 'सुधारक' सुरु केले. केसरीतून राष्ट्रवादाची प्रेरणा, स्वभाषा, स्वधर्मा विषयीचा अभिमान आणि इंग्रज सरकार यांचे सतत खंडण केसरीतून होत असे, तर आगरकरांनी मात्र सुधारकातून समाजसुधारनेला प्राधान्य देऊन आधुनिक, प्रगत समाजनिर्मितीला त्यांनी महत्त्व दिले. याबरोबरच समाजात या काळात दुसरा एक प्रवाह ही कार्यरत होता आणि त्याही प्रवाहाचे माध्यम हे वृत्तपत्रच होते. तो म्हणजे म.फुले यांच्या विचाराने प्रवाहित झालेला होय. म.फुलेची प्रेरणा घेऊनच 'दीनमित्र' व 'दीनबंधु' हे वृत्तपत्र चालवली जात होती. गरीब, कष्टकरी, बहुजन समाजाच्या व्यथा या वृत्तपत्रात मांडल्या जात होत्या या सर्व गोष्टी बरोबर त्या काळात फार मोठया प्रमाणात वृत्तपत्राचा वापर होऊ लागला. स्वातंत्र्याच्या चळवळीत वृत्तपत्राची कामगिरी ही अविस्मरणीय अशी आहे.

पुढे न.चि.केळकर 'केसरी' अ.ब.कोल्हाटकर 'संदेश',कृ.प्र.खाडिलकर 'लोकमान्य', 'नवाकाळ', डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी 'मूकनायक', 'बहिष्कृत भारत', 'प्रबुध्द', प्र.के.अत्रे 'नवयुग', 'जयहिंद', 'मराठा', आनंद कृष्णराव वाघमारे यांनी 'मराठवाडा' असे विविध वृत्तपत्र या काळात निघाली व झुंजार आणि निर्भिड पत्रकारांनी ही पत्रकारिता पुढे नेली. समाजातील दोष दाखवून समाजसुधारणा करण्यावर भर दिला संयुक्त महाराष्ट्र आंदोलन यासारख्या क्षेत्रामध्ये यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. समाजजीवनाच्या विशाल क्षेत्रात दिवसेंदिवस प्रगती झपाटयाने होत आहे. पर्यावरण, विज्ञान, तंत्रज्ञान, क्रीडा अशी असंख्ये क्षेत्रे वृत्तपत्रातील, व्यवसायातील विविधंगी कर्तबगारीला खूली झाली आहेत. पत्रकारितेचे स्वरुप विविधांगी आणि व्यापक बनले आहे. संगणक प्रणालीमुळे ई-न्यूज प्रणाली विकसित झालेली आहे. दूरचित्रवाणी व आकाशवाणी अशा विविध माध्यमांच्या प्रगतीत काळानुसार बदल करुन दूरचित्रवाणीवरील वृत्तपत्र ही संकल्पना आज आलेली आहे. घरात बसल्याबसल्या सर्व वृत्तपत्र डोळयासमोर ठेवून त्यातील सर्व लेखाजोखा आपण ठेवू शकतो. मराठी पत्रकारितेचे बदलते स्वरुप पहाताना प्रामुख्याने तीन वेगवेगळे कालखंडाच्या अनुषंगाने पडताळा आपणास करता येतो.

**स्वातंत्र्यपूर्व काळ :- (१८३२-१९४७)**

मराठीतील पहिले वर्तमान पत्र बाळशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी १८३२ ला सुरू केले. सुरुवातील त्याचे स्वरुप हे पाक्षिक होते आणि ते मराठी व इंग्रजी भाषेतून प्रकाशित होत असे. स्वातंत्र्यपूर्व काळात आपल्या देशातील जुनाट विचार काढून पाश्चात्य विचार व ज्ञानाचा प्रसार मुंबईप्रांतासह आपल्या देशात केला. दर्पणने आपल्या देशातील माणसामाणसातील भेदभाव जातीयता, अस्पृश्याता, जूनाट रुढी, अंधश्रद्धा व जनतेची ग्राऱ्हाणी ब्रिटीश अधिकाऱ्याच्या लक्षात आणून दिली. 'दर्पण' हे मराठीतील पहिले संपूर्ण वृत्तपत्र होते. त्याबरोबरच त्या काळात केसरी प्रभाकर काळ, ज्ञानप्रकाश, सुधारक, बहिष्कृत भारत, मुकनायक,संदेश या वृत्तपत्रानी या काळात बालविवाह, सतीप्रथा, शेतकऱ्याचे प्रश्न, दलितांचे प्रश्न, स्वातंत्र्यप्राप्तीसाठी प्रबोधन अशा अनेक समस्याना वृत्तपत्रातून वाचा फोडण्याचे काम केले.

स्वातंत्र्यापूर्वी महाराष्ट्रात व देशात सुप्रसिध्द असे पत्रकार होते. ते प्रसिध्द होते ते मुख्यतः राजकारणातील व समाजकारणातील त्यांच्या कामगिरीमुळे लोकहितवादी, टिळक आणि आगरकर हे पत्रकार समाजाचे नेतृत्व करीत असत त्यांच्या विचारांचा समाजमाणसावर निश्चित प्रभाव पडत असे. या सर्व नेत्याची पत्रकारिता हे ध्येयप्राप्तीचे एक साधन होते आणि आपल्या विद्वतेमुळे, व्यासंगामुळे ते जनमाणसात उच्च स्थानी विराजमान झाले. म्हणून महाराष्ट्राचा सामाजिक इतिहास समजण्यासाठी या वृत्तपत्राची भूमिका महत्वपूर्ण आहे.

**स्वातंत्र्योत्तर काळ (१९४८ ते १९९०)**

स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्रा पुढील आणि देशापुढील प्रश्नाचे स्वरुप बदलेले होते. लोकशाही शासन प्रणाली देशाने स्वीकारली असल्याने चौथा महत्वाचा आधारस्तंभ म्हणून पत्रकारितेला महत्व प्राप्त झाले आता आपण स्वतंत्र झालो आपले सगळे प्रश्न चटकण सुटतील असे सर्वसामान्य माणसाला वाटत होते. पण तसे झाले नाही लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठी वृत्तपत्राने याकाळातही अतिशय महत्वाची भूमिका पार पुढील आव्हाने बदलली पारंतत्र्याच्या काळात देशाला स्वातंत्र्य मिळावे, त्यासाठी समाज

प्रबोधन करणे हे वृत्तपत्राचे मुख्य ध्येय होते. तसेच लोकांच्या आश पाडली. आणि आकांक्षा व्यक्त करण्याचे काम वृत्तपत्रानी केले. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर इंडियन एक्सप्रेस वृत्तपत्र भाषावाद प्रांतरचनेच्या काळात आणि संयुक्त महाराष्ट्र आंदोलन पर्वात महाराष्ट्राचे नामवंत लेखक प्र.के.अत्रे यांनी महाराष्ट्राची अस्मिता जागी करण्यासाठी 'मराठा' हे वृत्तपत्र सुरु केले. याच काळा दरम्यान सकाळ, अंजिठा, पुण्यनगरी, तरुणभारत, लोकमत, संचार, साधना, महाराष्ट्र टाईम्स, मराठवाडा अशी वृत्तपत्रे सुरु झाली. या वृत्तपत्रानी राष्ट्रीय, राज्य आणि जिल्हापातळीवरील प्रश्नाची चर्चा केली तसेच या वृत्तपत्रानी पक्ष नि व्यक्ती यांच्या प्रतिमा तयार करण्याचा प्रयत्न केला. या काळात प्राथमिक टप्यामध्ये वृत्तपत्र मांडणी विषयी काही तत्व पाळण्यात येऊ लागली विषयाची मांडणी ही वृत्तपत्राच्या चौकटीत राहून सर्व विषयांचे मूल्याकन करण्यात आले.

**जागतिकीकरनानंतरचा काळ**

१९९१ नंतर आपल्या देशाने मुक्त आर्थिक धोरणाचा स्वीकार केला आणि जग हे अतिशय जवळ आले. त्याला पत्रकारिताही अपवाद राहिली नाही वृत्तपत्राचे हे जग नव्याने सुरु झालेल्या आर्थिक धोरणातून मार्ग काढत पुढे जाण्याचा प्रयत्न करीत आहे. जागतिकीकरणाच्या काळानंतर फार मोठया प्रमाणात नवे तंत्रज्ञान उपलब्ध झाले. त्यामुळे वृत्तपत्राच्या क्षेत्रात क्रांतीच झ ााली आलिकडच्या काळात तर वृत्तपत्राचे स्वरुपच बदलले आहे. समाजातील लोकांच्या सर्व गोष्टीची माहिती वृत्तपत्र आज देवू लागले आहेत. ग्लोबल वॉर्निग, जीवनमूल्य, समाजापुढील नवीन आव्हाने इत्यादी गोष्टीची दखल वृत्तपत्र आज घेत आहेत. आजच्या वृत्तपत्राचे स्वरुप बघितले तर त्यामध्ये खूप मोठया प्रमाणात काळानुसार बदल वृत्तपत्राने स्वीकारलेला आपणास पहावयास मिळतो आहे. वेगवेगळया रंगीत वेगळया विषयाची माहिती देणाऱ्या पुरवण्या आकर्षक व रंगीत छपाई सोशल नेटवर्कींग, वेब आवृत्या व्यवसायीक वृत्ती, राजकिय आशी बांधीलकी हेड न्यूज इत्यादी बदल आज या मध्ये झालेले आहेत.

**समारोप :-**

मराठी पत्रकारितेत घडून आलेल्या बदलाचा व भूमिकेचा परामर्श घेताना प्रस्तुत, शोधनिबंधात मराठी वृत्तपत्राचे बदलते स्वरुप या विषयावर विचार मांडण्याचा प्रयत्न केला आहे. यावरुन असे आढळून आले आहे की, काळाप्रमाणे जो बदल झाला त्याचा स्वीकार करुन पत्रकारितेने तो स्वीकारलेला आहे. स्वातंत्र्यपूर्व, स्वातंत्योत्तर व जागतिकीकरणाचा कालखंड यामधील स्वरुप बदललेले आहे. जागतिकीकरणाच्या काळात तंत्रज्ञानाच्या वापरामुळे पत्रकारितेमध्ये आमूलाग्र बदल झाला आहे. दूरदर्शन, इंटरनेट, संगणक, यामुळे पत्रकारिता प्रभावी बनली आहे. तसेच कल्पक मांडणी व सुंदर सजावट यांचा चांगला संगम या काळाचे आव्हान स्वीकारण्यासाठी मराठी वृत्तपत्राने आपले स्वरुप बदलेले आहे.

**संदर्भग्रंथ :-**

१) मराठी वृत्पत्राचा इतिहास, रा.के लेले, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे- १९८४.
२) पत्रकारितेचे वास्तव, राजोरे राजेश, दिलीपराज प्रकाशन, प्रा.लि.
३) भारतातील प्रसार माध्यमे काल आणि आज, अनुवाद जयमती दळवी डायमंड पब्लिकेशन, पुणे.
४) पत्रकारिता विचार व व्यवहार- प्रा.गव्हाणे सुधीर प्रचार प्रकाशने, कोल्हापूर १९९५.
५) पत्रकारितेचे मुलतत्वे, प्रा.डॉ.पवार सुधाकर, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.
६) मुद्रीत प्रसार माध्यमासाठी लेखन, य.च.म.मु.विद्यापीठ, नाशिक.